R.No.MAHMAR/25/A3029

# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ५ वे अंक ९० मंगळवार दि.१४ ऑक्टोंबर २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# एकत्र लढण्याबाबत आठवडाभरात महाविकास आघाडीचा निर्णय

मुंबई : प्रतिनिधी

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका एकत्रित लढवण्याबाबत महाविकास आघाडीचे नेते एकत्र बसून निर्णय घेतील. उद्या आघाडीच्या नेत्यांची बैठक होईल आणि येत्या आठवडाभरात स्थानिक पातळीवरील आघाडीबाबत धोरण ठरवले जाईल असे राष्ट्रवादी काँग्रेसचे (श.प.) अध्यक्ष शरद पवार यांनी आज पक्षाच्या बैठकीत बोलताना स्पष्ट केले. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या तरुणान ५० टक्के तिकिटे दिली जातील असे सुतोवाच करताना, पक्षबांधणीसाठी भाकरी फिरवण्याचे संकेत शरद पवारांनी दिले.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि पदवीधर व शिक्षक मतदारसंघांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज पक्षाध्यक्ष शरद पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाची एक बैठक मुंबईत झाली. बैठकीला पक्षाच्या कार्याध्यक्षा खा. सुप्रिया सुळे, प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, विधीमंडळ पक्षनेते जयंत पाटील, राजेश टोपे, बाळासाहेब पाटील, रोहित पवार, डॉ. अमोल कोल्हे, खा. निलेश लंके, यांच्यासह पक्षाचे सर्व खासदार, आमदार व प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

बैठकीत स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका आणि पदवीधर व शिक्षक मतदारसंघांच्या निवडणुकीच्या दृष्टीने संघटनात्मक बांधणीसाठी आणि पुढील रणनीती ठरवण्याबाबत चर्चा झाली. स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये स्थानिक पातळीवर आघाडी करावी की नाही याबाबत स्थानिक खासदार, आमदार व पदाधिका-यांची मते जाणून घेण्यात आली. उद्या महाविकास आघाडीचे नेते मतदारयादीतील गोंधळाबाबत राज्य निवडणूक अधिका-यांची भेट घेणार आहेत.



मनसे प्रमुख राज ठाकरे हे ही या शिष्टमंडळात असणार आहेत. त्या भेटीनंतर आघाडीच्या नेत्यांची बैठक होणार असून त्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत प्राथमिक चर्चा होईल व धोरणात्मक निर्णय घेतला जाईल. एकत्र लढायचे की नाही, याबाबत निर्णय झाल्यानंतर जिल्हानिहाय, महापालिका निहाय बैठका घेण्याचे आज निश्चित करण्यात आले. प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना आघाडीतील पक्षांमध्ये मतविभागणी होऊ नाय यासाठी एकत्र लढण्याची आमची भूमिका असल्याचे स्पष्ट केले. मनसेच्या आघाडीतील सहभागाबाबत अद्याप कोणतीही चर्चा झाली नसल्याचे त्यांनी सांगितले.

तरुणांना संधी

शरद पवार यांनी बैठकीत मार्गदर्शन करताना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या पण पक्षासाठी परिश्रम घेणा-या युवकांना ५० टक्के तिकिटे दिली जावीत, अशा सूचना पदाधिका-यांना दिल्या. संग्राम जगताप यांच्यासंदर्भात निर्माण झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर पवार यांनी पदाधिका-यांना, नेत्यांना जातीय सलोखा ठेवण्याच्या सूचना दिल्या. सरकारमधील काही नेते व मंत्रीच सध्या वादग्रस्त बोलत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

तोकड्या मदतीवर टीका

महायुतीने पूरग्रस्त शेतक-यांना केलेल्या मदतीवर शरद पवार यांनी टीका केली. अतिवृष्टीच्या संदर्भात राज्य सरकार जी मदत करत आहे ती तटपुंजी आहे. केंद्रीय पथकाने येऊन पाहणी केली पाहिजे होती. पूर्वी केंद्रीय पथक येऊन पाहणी करून भरघोस मदत देत असे याचीही आठवण त्यांनी दिली.

# हा तुमचा देश आहे जोपर्यंत तुम्ही हे करत राहाल तोपर्यंत रस्त्यावर कचरा फेकल्यामुळे रशियन पर्यटक संतापली ; किरण रिजिजू यांनीही दिली प्रतिक्रिया



एका रशियन महिलेचा व्हिडिओ भारतात वेगाने व्हायरल होत आहे. व्हिडिओमध्ये, पर्यटकरस्त्यावर कचरा टाकल्याबद्दल मुलांना फटकारताना दिसत आहे. हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर, अनेक इंटरनेट वापरकर्त्यांनी त्यावर प्रतिक्रिया दिल्या आहेत. हा व्हिडिओ मीना फाइझ्स नावाच्या इन्स्टाग्राम अकाउंटवरून शेअर करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनीही व्हिडिओवर प्रतिक्रिया दिली आहे.

महिलेने व्हिडिओ शेअर करत 'हे' म्हटले महिलेने व्हिडिओला कॅप्शन दिले, म्हणूनच शिक्षण महत्वाचे आहे. भारतीय मुलांशी संभाषण चुकीचे झाले. व्हिडिओमध्ये, महिला मुलांना जमिनीवर पडलेला कचरा उचलण्यास सांगते. मात्र, मुले तिच्याकडे दुर्लक्ष करतात. महिला उत्तर देते, तुम्ही काय केले? तुम्ही कचरा टाकला. तो उचला आणि कचराकुंडीत टाका. परंतु, मुले महिलेचा सल्ला गांभीर्याने घेत नाहीत आणि कचरा जमिनीवर फेकत राहतात.

महिलेने पुढे म्हटले, हे बरोबर नाही. हे पहा. हा तुमचा देश आहे. जोपर्यंत तुम्ही असे करत राहाल तोपर्यंत तुम्ही कचऱ्यातच राहाल. त्यानंतर महिलेने त्याला पैसे देण्यास नकार दिला.

किरण रिजिजू यांनी अशी प्रतिक्रिया दिली केंद्रीय मंत्री किरण रिजिजू यांनी त्यांच्या इंस्टाग्राम स्टोरीवर या घटनेचा व्हिडिओ शेअर केला. त्यांनी व्हिडिओला कॅप्शन दिले, कृपया संवेदनशील रहा. अनेक इंटरनेट वापरकर्त्यांनी व्हिडिओवर प्रतिक्रिया दिल्या आहेत आणि पर्यटक महिलेच्या मुद्द्याला दुजोरा दिला आहे. एका वापरकर्त्याने लिहिले, मुलांना या गोष्टींबद्दल माहिती दिली पाहिजे. दुसऱ्या वापरकर्त्याने लिहिले, तुम्हाला हे सर्व पाहावे लागले याबद्दल आम्हाला वाईट वाटते.

# '२०० टक्के टॅरिफ' ; आता भारत-पाकिस्तान युद्धबंदीबद्दल ट्रम्पचा मोठा दावा



नोबेल पुरस्कार नाकारल्यानंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना मोठा धक्का बसला, परंतु भारत-पाकिस्तान युद्धबंदीचे श्रेय घेण्यास ते अजूनही थांबत नाहीत. कारण ट्रम्प यांनी पुन्हा एकदा दावा केला आहे की त्यांनी टॅरिफची धमकी देऊन जगभरातील अनेक युद्धे थांबवली आहेत. सोमवारी इस्रायलला रवाना होण्यापूर्वी ट्रम्प यांनी जाहीर केले की,ते सर्वांना आनंदी करतील, असे सांगून की इस्रायल आणि हमासमधील युद्ध संपले आहे. एका वृत्तसंस्थेच्या वृत्तानुसार, एअर फोर्स वनवर माध्यमकर्मींशी बोलताना ट्रम्प म्हणाले, इस्रायल आणि हमासमधील युद्ध संपले आहे आणि मला विश्वास आहे की युद्धबंदी करार कायम राहील. तो टिकून राहण्याची अनेक कारणे आहेत, परंतु मला वाटते की लोक त्याला कंटाळले आहेत. ते पुढे म्हणाले, आम्ही सर्वांना आनंदी करू, मग ते यहूदी असोत, मुस्लिम असोत किंवा अरब असोत. इस्रायलनंतर, आम्ही इजिप्तला जाऊ आणि सर्व शक्तिशाली आणि प्रमुख देशांच्या नेत्यांना भेटू. ते सर्व या कराराचा भाग आहेत.

ट्रम्पने अफगाणिस्तान-पाकिस्तानबद्दल काय म्हटले? ट्रम्पने पाकिस्तान-अफगाणिस्तान युद्धावरही प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, हे माझे आठवे युद्ध असेल जे मी थांबवले आहे. मी ऐकले आहे की पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमध्येही युद्ध सुरू आहे, पण मला माझ्या युद्धाची वाट पहावी लागेल. मी आणखी एक युद्ध संपवत आहे. मी युद्ध थांबवण्यात तज्ज्ञ आहे. मी वर्षानुवर्षे सुरू असलेली अनेक युद्धे थांबवली आहेत, ज्यात ३१ वर्षांपासून सुरू असलेली युद्धे देखील समाविष्ट आहेत. ट्रम्प नोबेल पारितोषिक विसरू शकत नाहीत ट्रम्प यांना यावेळी नोबेल पारितोषिक मिळाले नाही, परंतु ते स्वतःला त्याचा उल्लेख करण्यापासून रोखू शकले नाहीत. ट्रम्प म्हणाले, मी लाखो लोकांचे जीव वाचवले. मी ते नोबेल पारितोषिकासाठी केले नाही, तर मी जीव वाचवण्यासाठी युद्धे थांबवली.

ट्रम्प यांनी यावेळी, मी केवळ शुल्क आकारणीद्वारे युद्धे थांबवली. उदाहरणार्थ, भारत-पाकिस्तान युद्ध. मी म्हणालो, 'तुम्हाला लढायचे असेल तर लढा; तुमच्याकडे अण्वस्त्रे आहेत. मी तुमच्या दोघांवर १००, १५० किंवा २०० टक्के शुल्क लादू.' मी २४ तासांत प्रकरण सोडवले.

# लँड फॉर जॉब्स प्रकरणात लालू कुटुंबाविरोधात खटला चालणार? ; आज न्यायालयात होणार फैसला

बिहारचे राजकीय नेते आणि राजद सुप्रीमो लालू प्रसाद यादव यांच्यासाठी आजचा दिवस महत्त्वाचा आहे. दिल्लीच्या विविध न्यायालयांमध्ये त्यांच्याविरुद्ध दाखल असलेल्या अनेक खटल्यांची सुनावणी १३ ऑक्टोबर २०२५ रोजी होणार आहे. यापैकी काही प्रकरणांमध्ये त्यांना प्रत्यक्ष हजर राहावे लागेल, तर काही प्रकरणांमध्ये त्यांच्या उपस्थितीशिवाय सुनावणी सुरू राहतील. लालू यादव यांचे पुत्र तेजस्वी यादव हे देखील या प्रकरणांमध्ये आरोपी आहेत. परिणामी, आजचा दिवस दोन्ही नेत्यांसाठी राजकीय आणि कायदेशीरदृष्ट्या महत्त्वाचा मानला जातो. प्रथम, सकाळी १० वाजता, दिल्लीतील विशेष सीबीआय न्यायालयात आयआरसीटीसी घोटाळ्याशी संबंधित सुनावणी होणार आहे. लालू प्रसाद यादव, तेजस्वी यादव आणि या प्रकरणातील इतर आरोपींना न्यायालयात प्रत्यक्ष हजर राहावे लागेल. रेल्वेमंत्री असताना लँड फॉर जॉब्सचा आरोप आयआरसीटीसी घोटाळा लालू प्रसाद यादव रेल्वेमंत्री असतानाचा आहे. त्यांच्यावर दोन रेल्वे हॉटेल्ससाठी निविदा देण्यात अनियमितता केल्याचा आरोप आहे, ज्यामुळे कंपन्यांना फायदा झाला आहे. या प्रकरणात सीबीआयने लालू कुटुंब आणि संबंधित कंपन्यांवर भ्रष्टाचार आणि कट रचल्याचा आरोप लावला आहे. आजच्या सुनावणीत, न्यायालय आरोपींची उपस्थिती आणि पुढील कार्यवाही निश्चित करेल. लँड फॉर जॉब्स प्रकरणाची सुनावणी आज लालू कुटुंबाशी संबंधित आणखी एक महत्त्वाचा खटला म्हणजे जॉब्स फॉर जॉब्स घोटाळा, ज्याची सुनावणी आज या न्यायालयात होणार आहे. हा खटला लालू प्रसाद यादव रेल्वेमंत्री असतानाचा आहे आणि त्यांच्यावर रेल्वे नोकऱ्यांच्या बदल्यात लोकांकडून जमीन घेतल्याचा आरोप आहे. आजच्या सुनावणीत या प्रकरणात आरोप निश्चित केले जातील.

# राजकीय नुकसान झाले तरी.; धंगेकर करणार शिंदेंची गोची? समज दिल्यानंतरही आपल्या भूमिकेवर ठाम

विद्येचे माहेरघर असलेल्या पुण्यातील वाढती गुन्हेगारी चिंतेचा विषय बनली आहे. सध्या पुण्यातील कुख्यात गुंड निलेश घायवळ हे प्रकरण राज्यात गाजत आहे. या प्रकरणावर शिवसेनेचे नेते रविंद्र धंगेकर यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. वाढत्या गुन्हेगारीवर रविंद्र धंगेकरांनी मंत्री चंद्रकांत पाटील यांनी लक्ष्य केले. यानंतर याचे पडसाद महायुतीत पाहायला मिळाले. यामुळे महायुतीमधील नेत्यांमध्ये नाराजीची चर्चा आहे. या संपूर्ण प्रकरणावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महायुतीत दंगा नको, असा सल्ला धंगेकरांना त्यांना दिला. मात्र, या सल्लानंतर रविंद्र धंगेकर यांनी आपल्या भूमिकेवर ठाम असल्याचे त्यांनी दिलेल्या प्रतिक्रेयवरून लक्षात येते. यानंतर त्यांनी पहिली प्रतिक्रिया देत मोठं विधान केले आहे.



भाजपला टोला एका वृत्त वाहिनीसोबत बोलताना रविंद्र धंगेकर म्हणाले, मी वेळ पडल्यास पुणेकरांसाठी स्वत:चं राजकीय नुकसान करायला तयार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तर एकनाथ शिंदे माझ्या पाठीशी आहेत त्यांनाही गुन्हेगारी नको आहे. भाजपचे नेते टीका करतात त्यांनी स्वतःला आरशात पाहावे, असा सणसणीत टोला त्यांनी भाजपला लगावला. शिंदे साहेबांशी माझी जी चर्चा झाली त्यावर मी सविस्तर बोलेन, अशीही प्रतिक्रिया त्यांनी यावेळी बोलताना दिली. रवींद्र धंगेकरांनी केलेल्या विधानावर शिवसेनेचे नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्यासोबत बोलणे झाले असल्याचे सांगितले. महायुतीत दंगा नको, असे त्यांना सांगितल्याचे शिंदे म्हणाले.

पण पुण्यामध्ये कायदा व सुव्यवस्था अबाधित राहिली पाहिजे. लेकीबाळींना व्यवस्थित फिरता आले पाहिजे. गोरगरीब जनतेला सर्वसामान्य नागरिकांना कुठलाही त्रास होता कामा नये, असे रवींद्र धंगेकरांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना सांगितल्याचे ते म्हणाले.

रविंद्र धंगेकर यांनी केलेल्या खळबळजनक आरोपांवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देखील प्रतिक्रिया दिली होती. आपले नेते एकनाथ शिंदे आहेत रवींद्रजींच्या लक्षात येईना आपण आता काँग्रेसमध्ये नाहीये, आपण शिवसेनेत आहोत धनुष्यबाणसोबत आहोत.

# वडिलांचे छत्र हरवलेल्या दोन पाल्यांचे हारुणभाई इनामदार यांनी स्वीकारले पालकत्व

## हारुणभाई इनामदार यांच्या कार्याचे सर्व स्तरातून होतेय कौतुक

केज शहरात स्व.अशोक रामकिसन सौदागर हे गॅस सिलेंडर वितरण करण्याचे काम करत होते त्यांची परिस्थिती हलकीची असून त्यांच्या जाण्याने सौदागर कुटुंब आज रोजी उघड्यावर आले असून त्यांचे आई-वडील हे देखील वयोवृद्ध आहेत. स्व. अशोक सौदागर यांच्या कुटुंबांना जगण्याचे कसल्याच प्रकारचे साधन नाही व त्यांना कसलाही कोणाचा आधार नाही व त्यांची दोन मुले लहान आहेत मुलाचे शिक्षणाचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत करणे गरजेचे आहे. सामाजिक, राजकीय,शैक्षणिक, वैद्यकीय,धार्मिक,क्षेत्रसह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी व सामाजिक संस्थांनी आणि नागरिकांनी स्वर्गीय अशोक सौदागर यांच्या कुटुंबीयांना मदत यावी असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले सर यांच्यासह मित्र परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे. सदरची मदत ही स्व. अशोक सौदागर यांचे वडील रामकिसन सौदागर यांच्याकडे करण्यात यावी असे सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले सर यांनी म्हटले आहे.

स्वर्गीय अशोक सौदागर हे तरुण युवक होते ते गॅस सिलेंडर वितरण करण्याचे काम करत होते केज शहरातील प्रत्येक घरामध्ये गॅस वितरण करण्यामुळे प्रत्येक कुटुंबाचे सदस्य बनले होते. आज ते जाण्याने मोठी पोकळी निर्माण झालेली आहे व त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे या सौदागर कुटुंबांना आधाराची व आर्थिक मदतीची फार मोठी गरज आहे त्याकरिता आम्ही आमच्या जनविकास फाउंडेशन व जीवन शिक्षण परिवाराच्या वतीने त्यांच्या दोन मुलांच्या शिक्षणाचे बारावीपर्यंतचे पालकत्व स्वीकारले आहे. याबरोबर जी समाजबांधव जबाबदारी देतील ती आम्ही सौदागर कुटुंबाची जबाबदारी स्वीकारण्यास कटिबद्ध आहोत परंतु सर्वच क्षेत्रातील लोकप्रतिनिधी यांनी पुढे येत सौदागर कुटुंबियांना होईल तेवढी मदत देऊन आर्थिक आधार देण्याचे काम करावे.

सौ.सीताताई प्रदीप बनसोड
नगराध्यक्षा न.प. केज



केज/प्रतिनिधी वडिलांचे छत्र हरवलेल्या दोन पाल्यांचे राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा जीवन शिक्षण संकुलचे सचिव व जनविकास फाउंडेशनचे प्रमुख हारुणभाई इनामदार यांनी पालकत्व स्वीकारले आहे. जन विकास फाउंडेशन व जीवन शिक्षण संकुलच्या माध्यमातून स्व. अशोक रामकिसन सौदागर यांच्या कुटुंबियांना आधार देण्याचे काम हारुणभाई इनामदार यांनी केली आहे, त्यांच्या कार्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, अशोक रामकिसन सौदागर वय ३५ वर्षे रा. अहिल्यादेवी नगर उमरी रोड केज या ठिकाणी त्यांचे आई- वडील, पत्नी व दोन लहान मुलासह वास्तव्यस होते.अशोक सौदागर हे केज शहरातील एका गॅस एजन्सी मार्फत केज शहरातील नागरिकांना गॅस सिलेंडरचे वाटप करून स्वतःच्या कुटुंबाचा उदार निर्वाह करत होते. परंतु अशोक सौदागर हे शनिवार दिनांक ११ ऑक्टोंबर २०२५ रोजी सायंकाळी च्या वेळी त्यांच्या कुलदैवताच्या यात्रेसाठी कोल्हापूर जिल्ह्यातील पठाण कुलवडी येथे श्री विठ्ठल बिरुदेव या कुल देवांच्या दर्शनासाठी जात असताना वाटेत नरसिंग वाडी येथील दत्त मंदिर नदीकाठी रविवार दिनांक १२ ऑक्टोंबर २०२५ रोजी सकाळी ५-४५ वाजण्याच्या सुमारास अंघोळ करण्यासाठी गेले असता पाण्यात बुडून अशोक सौदागर यांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे अशी प्राथमिक माहिती नागरिकांतून ऐकण्यास मिळत आहे परंतु स्व. अशोक सौदागर यांचा मृत्यू नेमका कसा व कशाने झाला आहे याची अधिकृत माहिती अद्यापही मिळाली नाही. दिनांक १३ ऑक्टोंबर २०२५ रोजी सकाळी ९-३० वाजता केज शहरातील क्रांतीनगर येथील सार्वजनिक स्मशानभूमी येथे स्व. अशोक रामकिसन सौदागर यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सामाजिक, राजकीय, शैक्षणिक,वैद्यकीय, धार्मिक क्षेत्रसह विविध क्षेत्रातील मान्यवर व स्व.अशोक सौदागर यांच्यावर प्रेम करणारे मित्रपरिवार आणि नागरिक उपस्थित होते. यावेळी अशोक सौदागर यांना श्रद्धांजलीपर मनोगत व्यक्त करताना सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले यांच्यासह काही नागरिकांनी स्व. अशोक सौदागर यांच्या कुटुंबियांना मदत करण्याचे आवाहन करण्यात आले. या आवाहनाला प्रतिसाद देत राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा जीवन शैक्षणिक संकुलचे सचिव व जनविकास फाउंडेशनचे प्रमुख हारुणभाई इनामदार यांनी स्व. अशोक सौदागर यांची दोन मुले चि.अथर्व अशोक सौदागर वय ८ वर्षे इयत्ता ३ री, चि.आरुष अशोक सौदागर वय ४ वर्षे यांच्या इयत्ता बारावी पर्यंतच्या शिक्षणाचे पालकत्व स्वीकारले आहे. हारुणभाई इनामदार यांच्या कार्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. स्वर्गीय अशोक सौदागर यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी व दोन लहान मुले असे त्यांचे कुटुंब आहे.

# संपादकीय

## तालिबान-भारत संबंधांचा नवा अर्थ

उमेश कुमार  भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील संबंध नेहमीच दृढ राहिले आहेत. गेल्या दोन दशकांत भारताने अफगाणिस्तानमध्ये तीन अब्ज डॉलर्सहून अधिक गुंतवणूक केली आहे. काबूलमधील संसदेची इमारत, सलमा धरण (जे आता अफगाण-भारत मैत्री धरण म्हणून ओळखले जाते) आणि जरंज-डेलाराम महामार्ग हे भारताच्या उपस्थितीचे ठळक प्रतीक आहेत. शिक्षण, आरोग्य, वीज आणि महिला सक्षमीकरण यांसारख्या क्षेत्रांमध्येही भारताने मोठ्या प्रमाणात मदत केली आहे. २०२१ मध्ये अमेरिकन सैन्याच्या माघारीनंतर तालिबानने पुन्हा सत्तेत येताच भारताला आपले दूतावास बंद करावे लागले. संबंधांमध्ये अंतर पडले आणि भारताने 'वेट अँड वॉच' भूमिका स्वीकारली. आता मात्र भारत पुन्हा सक्रिय झाला आहे. मुत्ताकी यांचा दौरा हाच त्याचा स्पष्ट संकेत आहे.

दिल्लीमध्ये पोहोचल्यानंतर मुत्ताकी यांनी भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांची भेट घेतली. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, अफगाणिस्तानची भूमी कोणत्याही विदेशी सैन्य किंवा सशस्त्र गटासाठी उपलब्ध राहणार नाही. हा संदेश केवळ सामान्य आश्वासन नव्हे, तर पाकिस्तान आणि अमेरिका या दोघांनाही उद्देशून दिलेला ठाम इशारा आहे. पाकिस्तानसाठी ही भूमिका धक्कादायक आहे. कारण, तो अफगाणिस्तानला नेहमीच आपल्या रणनीतीसाठी वापरत आला आहे. अमेरिकेसाठीही हा संदेश महत्त्वाचा आहे. कारण, वॉशिंग्टन अजूनही अफगाणिस्तानात अप्रत्यक्ष हस्तक्षेप ठेवतो. मुत्ताकी यांनी दिलेला हा संदेश स्पष्ट करतो की, तालिबान सरकार कोणाच्याही नियंत्रणात राहणार नाही.  देवबंद दौऱ्यामागील संदेश दिल्लीतील औपचारिक कार्यक्रमांनंतर मुत्ताकी यांनी उत्तर प्रदेशातील प्रसिद्ध इस्लामी शिक्षण संस्था दारुल उलूम देवबंदला भेट दिली. ही भेट केवळ सांस्कृतिक नाही, तर एक गूढ राजनैतिक संदेशही घेऊन आली आहे. तालिबानचा एक वरिष्ठ नेता देवबंदमध्ये जातो याचा अर्थ अफगाणिस्तान भारताची धार्मिक-सांस्कृतिक वीण समजून घेऊ इच्छित आहे आणि त्यात सामील होऊ इच्छित आहे.

पाकिस्तान-तालिबान दुरावा सध्या पाकिस्तान आणि तालिबानमध्ये तणाव वाढला आहे. तहरीक-ए-तालिबान पाकिस्तान सातत्याने पाकिस्तानी लष्करावर हल्ले करत आहे. पाकिस्तानने तालिबानला नियंत्रणात ठेवण्याची विनंती केली; पण तालिबानने हे स्पष्ट केले की, हा पाकिस्तानचा अंतर्गत प्रश्न आहे. या मतभेदामुळे दोन्ही देशांमध्ये दुरावा वाढला आहे. भारताने ही संधी ओळखली आहे आणि तीच भारताच्या नव्या राजनैतिक धोरणाची संधी बनली आहे. ड्युरंड रेषेवर दोन्ही देशांच्या सैन्यात चकमकी झाल्या आहेत. तालिबान नेतृत्वाखालील अफगाण सैन्याने पाकिस्तानच्या अनेक चौक्यांवर ताबा मिळवल्याचा दावा केला आहे. कुनर आणि हेलमंद प्रांतात झालेल्या गोळीबारात पाच पाकिस्तानी सैनिक ठार झाले. पाकिस्तानने अफगाण सीमेवर केलेल्या हवाई हल्ल्याला उत्तर म्हणून अफगाण सैन्याने पाकच्या सीमेलगतच्या काही भागांवर कारवाई केल्याचा दावा केला आहे. यातून दिसते की, तालिबान आता पाकिस्तानच्या छायेत राहिलेला नाही.  भारताची शांतिदूताची भूमिका  दोन वर्षांपासून भारताने तालिबानशी 'बॅक चैनल'द्वारे संपर्क सुरू ठेवला होता. आधी मानवीय मदतीच्या नावाखाली, नंतर व्यापार व सुरक्षा क्षेत्रात. काबूलमधील भारतीय दूतावास पुन्हा सुरू झाला. भारताने ५० हजार टन गहू, ५०० टन औषधं अन्य मदतसामग्री अफगाणिस्तानला दिली. ही मदत तालिबानसाठी दिलासा ठरली आणि संवादाचा पूलसुद्धा. मुत्ताकी यांचे गुंतवणुकीसाठी आमंत्रण दिल्लीमध्ये मुत्ताकी यांनी भारतीय गुंतवणूकदारांना अफगाणिस्तानच्या खनिज, ऊर्जा आणि शेती क्षेत्रात गुंतवणुकीचं खुले आमंत्रण दिलं. फगाणिस्तानमध्ये लिथियम, तांबे, कोबाल्ट आणि लोखंड यांसारख्या मौल्यवान खनिजांचे मोठे साठे आहेत, ज्यावर संपूर्ण जगाच्या मोठ्या अर्थव्यवस्था लक्ष ठेवून आहेत. चीनने आधीच अनेक करार केले आहेत. आता भारतासाठी हे एक मोठे आर्थिक आणि सामरिक संधीचे द्वार खुले झाले आहे. चीनने अद्याप तालिबान सरकारला औपचारिक मान्यता दिलेली नाही; पण व्यावहारिकदृष्ट्या त्यांच्यासोबत काम करत आहे. पाकिस्तान, चीन आणि अफगाणिस्तानमध्ये व्यापार मार्ग तयार करण्याची चर्चा सुरू आहे. चीन अफगाणिस्तानला 'बेल्ट अँड रोड' प्रकल्पात सामील करून मध्य आशियात आपली पाळंमुळं घट्ट करू इच्छितो. भारत ही स्पर्धा समजतो आणि म्हणूनच अफगाणिस्तानमध्ये भारताची सक्रियता ही चीनच्या उपस्थितीला दिलेली तितकीच ठाम प्रतिक्रिया आहे.

अमेरिका सध्या अफगाणिस्तानपासून थोडी फारकत घेत आहे; पण भारताच्या भूमिकेला सकारात्मकपणे पाहत आहे. वॉशिंग्टनला समजले आहे की, अफगाणिस्तानात भारताची उपस्थिती ही संपूर्ण क्षेत्राच्या स्थैर्यासाठी उपयुक्त ठरू शकते. भारताची सुरक्षा आणि सॉफ्ट पॉवर तालिबानच्या सत्तेच्या सुरुवातीच्या काळात आयएसआयएस-खुरासान सारख्या गटांनी अफगाणिस्तानातील भारतीय हितसंपत्तीवर हल्ल्यांचे संकेत दिले होते. आता तालिबान अशा गटांविरुद्ध कठोर भूमिका घेत आहे. मुत्ताकी यांनी स्पष्टपणे सांगितले की, अफगाण भूमी कोणत्याही देशाविरुद्ध वापरू दिली जाणार नाही. भारतासाठी ही एक महत्त्वाची आश्वासक गोष्ट आहे. भारत दरवर्षी सुमारे ४००० अफगाण विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देतो. आता काबूलमध्ये एक तांत्रिक प्रशिक्षण संस्था आणि औषधनिर्मिती केंद्र उभारण्याचा विचार सुरू आहे. भारताची ही भूमिका सॉफ्टपॉवरची असून, ती अमेरिका व चीनपासून वेगळी ओळख निर्माण करते. भारताचा उद्देश आहे, अफगाण युवकांना शिक्षण व रोजगाराच्या संधी देऊन दहशतवाद कमजोर करणे. भारताचे अफगाण धोरण नेहमीच स्वतंत्र व संतुलित राहिले आहे. भारताने कधीही सैन्य हस्तक्षेप केला नाही.

# पुढचं पाऊल

अफगाणिस्तानात जेव्हा अलीकडे मोठा भूकंप आला तेव्हा भारताने सर्वात प्रथम मदत दिली. भारत आमचा घनिष्ठ मित्र आहे अन् परस्परांचा आदर, व्यापार आणि दोन्ही देशांतील नागरिकांच्या परस्पर संबंधांवर आधारित संबंध आम्हाला हवे आहेत, असे भारत भेटीवर आलेले आमीर खान मुत्तकी यांनी म्हटले आहे. मुत्तकी हे अफगाणिस्तानचे परराष्ट्र मंत्री आहेत. त्यांची भारत भेट एक ऐतिहासिक अशीच आहे. त्याचे कारण जगात आणि विशेषत: आशियात जे काही घडते आहे त्याकरता अफगाणिस्तानचे जवळ असणे किंवा त्यांच्याशी सलोखा असणे अनेकार्थाने महत्त्वाचे आहे. संबंध दृढ करण्यासाठी परस्परांशी विचार विनिमय करण्याची यंत्रणा तयार करण्याचा मानसही मुत्तकी यांच्या माध्यमातून अफगाणिस्तानने बोलून दाखवला आहे, ते महत्त्वाचे आहे.

अफगाणिस्तानचा इतिहास आणि वर्तमानही दाहक आहे. अगदी अलीकडच्या दशकांत अगोदर रशिया आणि त्यानंतर अमेरिका या जगातील दोन महासत्तांनी या देशावर नियंत्रणाचा प्रयत्न केला. तथापि, अफगाण कट्टर राहिला आणि त्या सत्तांनाही नियंत्रण साधता आले नाही. किंबहुना काहीच होत नसल्याचे जाणवल्यावर जे नैराश्य येते त्यातूनच या देशांनी स्वत:हून अफगाणिस्तानातून माघार घेतल्याचेच दिसले. रशियाच्या बाबतीत अमेरिकेची फूस काही अंशी अफगाणला मदतीची ठरली असावी; तरी महासत्तांचा येथे टिकाव लागला नाही हे मान्य करायला हवे. अमेरिकेने अफगाणमधून काढता पाय घेतल्यावर जवळपास चार वर्षांपूर्वी अफगाणिस्तानात तख्तपालट झाला.

तालिबानने दुसर्यांदा तेथील सत्तेवर कब्जा केल्यामुळे हा देश जगात एकाकी पडला, सगळ्यांनी राजकीय संबंध संपुष्टात आणले. त्यात भारतही होता. भारतीय अधिकार्यांना माघारी बोलावण्यात आले आणि तेव्हापासून राजनैतिक स्वरूपाचे संबंध नव्हते. अफगाणमधील नव्या राजवटीला अन्य देशांप्रमाणे भारतानेही मान्यता दिलेली नाही. त्याचे कारण आहे तालिबानची विचारसरणी आणि तेथे असलेले अतार्किक अंतर्गत निर्बंध. अर्थात ९०च्या दशकात तालिबानने जेव्हा प्रथम सत्ता हस्तगत केली होती त्यावेळी जेवढा विरोध त्यांना झाला आणि एकाकी पाडले गेले, तेवढे त्यांच्या दुसर्या राजवटीत अद्याप झालेले नाही. मुत्तकी यांच्या भेटीकडे त्याच दृष्टिकोनातून पाहता येईल.

मुत्तकी यांच्यावर संयुक्त राष्ट्रांनी प्रदीर्घ काळासाठी विदेश यात्रांवर निर्बंध घातले. तालिबानच्या तत्कालीन राजवटीत ते शिक्षण मंत्री होते आणि आताही परराष्ट्र मंत्री आहेत. मात्र त्यावेळी जो रक्तपात आणि हिंसाचार झाला त्यात कुठेना कुठे मुत्तकी यांचा सहभाग होता हे त्यांच्यावरील कारवाईमागचे कारण होते. इतके कठोर निर्बंध त्यांच्यावर लादण्यात आले होते की ते परदेशात कुठेही जाऊ शकत नव्हते. तालिबानचा अथवा त्यांच्या कट्टर विचारसरणीचा जगात अन्यत्र प्रसार होऊ नये, त्यांना कुठे आपले बस्तान बसवायला जागा मिळू नये हा यामागचा विचार. पहिल्या राजवटीच्या तुलनेत तालिबानची दुसरी राजवट काहीशी मवाळ भासली हे एक कारण असावे किंवा जगातील चित्र वेगाने बदलत असल्यामुळे अफगाणबाबत आताचा समज आणि विरोधही संयत होत गेला. त्यामुळेच देशांनी विशेषत: पश्चिमेकडच्या देशांनी मुत्तकी यांच्यावरील बंदी हटवली व त्यांचा भारत दौरा झाला. भारताने मानवतेच्या दृष्टिकोनातून तेव्हाही आणि आताही अफगाणिस्तानला मदतच केली आहे. तथापि, तालिबान राजवटीपासून अधिकृतपणे लांबच राहण्याचे त्यांची कट्टरता हे एकमेक कारण नव्हते. महिलांच्या बाबतीत तालिबानचे धोरण कुख्यात आहे. तेथील महिलांना आणि मुलींना आजही स्वातंत्र्य नाही. शिक्षणापासून सगळीकडेच त्यांच्यासाठी दारे बंद आहेत. हे भारताला मान्य नव्हते, तद्वतच अफगाणिस्तानातील त्यांच्या पूर्वीच्या राजवटीची पाकिस्तानशी असलेली घनिष्ठता आणि पाकिस्तानचा त्यांच्यावर असलेला प्रभाव हे मुख्य कारण होते.



भारताने अफगाणबाबत सौम्यता दाखवली असती, तर दोन्ही देशांतील संचार काहीसा शिथिल राहिला असता आणि कदाचित काश्मीरच्या संदर्भाने ते भारतासाठी तापदायकच ठरले असते. काश्मीरमधील दहशतवादाला त्यामुळे मदतच झाली असती. पाकिस्तानी दहशतवाद्यांनी भारताच्या प्रवासी विमानाचे अपहरण करून ते थेट कंधारलाच नेण्यात आले होते हे विसरता येत नाही. त्यामुळे तेथपासून सुरुवात करायची झाल्यास संबंध सामान्य होण्यास निश्चितच काही काळ जावा लागेल. आज भारताच्या सर्व शेजारी देशांमध्ये कमालीचे राजकीय आणि आर्थिक अस्थैर्य आहे.

नेपाळ, श्रीलंका, बांगलादेश आणि पाकिस्तान या सर्वच देशांच्या विविध अडचणी आणि समस्या आहेत. आशियात भारताची लोकशाही राष्ट्र म्हणून, स्थिर आणि वेगाने विकसित होणारे राष्ट्र म्हणून उंची वाढली आहे. काही वेळा काही साध्य करत असताना त्यात अडथळे निर्माण करणार्या शक्तींचाही मुकाबला करावा लागतो. चीन आणि अमेरिकादी देश भारताला या शेजार्यांच्या गोंगाटातून सहजी बाहेर पडू देणार नाहीत. तालिबानच्या दुसर्या कार्यकाळात भलेही अफगाणिस्तानला एका प्रतिष्ठित राजवटीचा दर्जा मिळाला नसेल आणि तो देण्याची वेळ अजून आलीही नसेल तरीही त्यांच्याशी मर्यादित संबंध राखणे हे आवश्यक झाले आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणात कोणताही व्यवहार एकतर्फी नसतो. तेथे देवाण-घेवाण करावीच लागते.

भारताला व्यूहात्मकदृष्ट्या आणि आपल्या सुरक्षेच्या दृष्टीने अफगाणिस्तानशी संबंध महत्त्वाचे आहेत. जेणेकरून पाकिस्तान अन्य ताकदींच्या आश्रयाने अफगाणला पुन्हा दहशतवाद्यांचा तळ बनवू शकणार नाही. भारताला तेथे मदत कार्य आणि मानवतेच्या भावनेने सहकार्य करत राहणे महत्त्वाचे राहील, भलेही अफगाणला मान्यता दिलेली नसो संवाद ठेवावा लागेल. भारताचे जगातील स्थान आणि प्रतिमा ही अफगाणला त्यांच्या अन्य देशांशी संबंधांत सुधारणा करण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. अर्ध शतकापूर्वीचे जग आणि आताचे जग वेगळे आहे. आता सगळ्यांना सगळ्यांत लिप्त करत अलिप्त राहण्याचीही कसरत करावी लागणार आहे. त्या अनुशंगाने मुत्तकी यांची भारत भेट एक पुढचे पाऊल ठरावी.

# मूठभर धनिकांचा भारत

भारतात आर्थिक विषमता पूर्वीच्या तुलनेत केवळ वाढलेलीच नाही, तर तिचा वेगही झपाट्याने वाढला आहे. भारताची खरी शक्ती १४० कोटी जनतेत दडलेली आहे. असामनता ही केवळ आर्थिक समस्येपुरतीच मर्यादित नसून लोकशाही, समाज आणि देशाच्या स्थैर्यासाठीदेखील धोकादायक आहे.

जागतिकीकरणाची प्रक्रिया जगभरामध्ये सुरू झाली त्याला आता चार दशकांहून अधिक काळ लोटला आहे. भारतामध्ये नव्वदीच्या दशकामध्ये जागतिकीकरणाचे वारे आले आणि त्यानंतरच्या गेल्या ३५ वर्षांमध्ये आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक, वैयक्तिक अशा सर्वविध स्तरांवर चांगले-वाईट परिणाम झालेले दिसले. हे एक प्रकारचे स्थित्यंतरच होते. जागतिकीकरणाच्या सकारात्मक आणि नकारात्मक अशा दोन्ही बाजूंविषयी आजवर अनेक पातळ्यांवर चर्चा झाल्या आहेत. त्यामध्ये एक सामायिक बाब दिसून आली ती म्हणजे या आर्थिक प्रतिमानामुळे विषमतेला चालना मिळत आहे. जगप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ थॉमस पिकेटी यांनी तर साद्यंत आणि जमिनी स्तरावरील अहवालातून ही बाब निदर्शनास आणून दिली आहे.

'ऑक्सफॅम'च्या दरवर्षीच्या अहवालातून वाढत चाललेल्या आर्थिक विषमतेवर प्रकाशझोत टाकला जातो आणि जगभरातील धोरणकर्त्यांच्या डोळ्यांमध्ये अंजन घालण्याचे काम केले जाते. भारतात शेअर बाजाराने विक्रमी पातळी गाठली आहे. कॉर्पोरेट कंपन्यांनी अब्जावधींचा बाजार गाठला आहे. तथापि, या आर्थिक सुबत्तेची फळे १४४ कोटी लोकांना मिळत आहेत का? याचे उत्तर दुर्दैवाने नाही असे आहे. याचे कारण भारतातील अब्जाधीशांची वाढती संख्या. ही संख्या अन्य देशांनाही आश्चर्यचकित करणारी ठरत आहे. श्रीमंत आणि गरीब यांच्यातील दरी येणार्या दिवसागणिक दुरावत चालली आहे.

१ ऑक्टोबर २०२५ रोजी 'एम ३ एम इंडिया' आणि हुरुन रिच लिस्ट जारी करण्यात आली. यानुसार भारतात एक हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक मालमत्ता असणार्यांचे प्रमाण १६८७ असल्याचे म्हटले आहे. याचाच अर्थ त्यांचे एकूण नेटवर्थ सुमारे १६७ लाख कोटी रुपये असून ते भारताच्या जीडीपीच्या निम्मे आहे. हा आकडा केवळ श्रीमंती दाखवत नाही तर देशातील आर्थिक आणि सामाजिक व्यवस्थेवर व धोरणावर प्रश्नचिन्ह निर्माण करतो.

शेतकरी संघटनेचे ज्येष्ठ नेते स्व. शरद जोशी यांनी ज्या 'इंडिया' आणि 'भारत' या शब्दांमध्ये देशातील स्थितीचे वर्णन केले होते, ती आज ठळकपणाने दिसू लागली आहे. आज देशात दोन प्रकारचे वर्ग पहावयास मिळतात. एकीकडे अतिश्रीमंत अब्जाधीश असून त्यांच्याकडे कोट्यवधी रुपयांचे महाल, खासगी जेट आणि अमाप धनसंपत्ती आहे; तर दुसरीकडे दोनशे ते तीनशे रुपयांच्या रोजंदारीवर काम करणारे कोट्यवधी मजूर आहेत. लाखो शेतकरी कर्जाच्या ओझ्याखाली दबत चालले आहेत. हजारो मजूर शहरातील कारखान्यात आणि बांधकामाच्या ठिकाणी काम करत आहेत आणि तरुण मंडळी बेरोजगारीचा सामना करत आहेत. महिलांना चांगले शिक्षण आणि रोजगारासाठी अधिकाधिक संघर्ष करावा लागत आहे. असमानतेमुळे निर्माण झालेला फरक केवळ उत्पन्नातींल नसून तो संधी आणि जीवनमानाच्या गुणवत्तेतीलही आहे.

अर्थतज्ज्ञांच्या आणि सामाजिक क्षेत्रातील अभ्यासकांच्या मते, आर्थिक विषमतेचा हा परिणाम पिढ्यान्पिढ्या राहतो. गरीब आई-वडील मुलांना चांगले शिक्षण देऊ शकत नाहीत. परिणामी पुढची पिढी देखील गरिबीचे जीवन जगते. रोजगारसंधी आकुंचन पावत असल्याने तरुणांमध्ये नैराश्य आणि हतबलता वाढते आणि हेच वातावरण गुन्हे, अमलीपदार्थांचे सेवन आणि हिंसेला खतपाणी घालते. त्यामुळेच शहरात झोपडपट्टीचे आणि गुन्हेगारीचे प्रमाण वाढत आहे. लोकशाहीवर देखील या स्थितीचा विपरित परिणाम होतो.

गेल्या काही वर्षांत राजकारणात धनशक्तीला महत्त्व आले आहे. निवडणुकीसाठीचा हा निधी राजकीय पक्षांना मोठ्या कॉर्पोरेट कंपन्यांकडून येतो आणि त्या बदल्यात कॉर्पोरेटधार्जिणी धोरणे अंमलात आणली जातात. सर्वसामान्यांचा वापर केवळ मतदानापुरता केला जातो. त्यांचा आवाज दिवसेंदिवस कमी होताना दिसत आहे. परिणामी जनतेसाठी असणारी लोकशाही आता हळूहळू धनवान लोकांच्या हाती गेली आहे. अशाच पद्धतीने असंतुलन वाढत गेले तर लोकशाहीवरचा विश्वास कमी होऊ शकतो.

काही अर्थतज्ज्ञांच्या मते, श्रीमंतांच्या मालमत्तेतून गुंतवणूक वाढेल आणि रोजगार निर्मिती होईल. परंतु प्रत्यक्षात सर्वसामान्यांचा खिसा रिकामा असेल तर बाजारात क्रयशक्ती येईल कुठून? मागणी अभावी उत्पादनांची विक्री न झाल्यास उत्पादन पडून राहील आणि उद्योगही ठप्प पडतील. आज धनिकांकडून केवळ फायद्याच्या ठिकाणीच गुंतवणूक केली जाते. गरीब आणि मध्यमवर्गीयांच्या अपेक्षा पूर्ण करण्याच्या क्षेत्राकडे लक्ष दिले जात नाही. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक बँकेनेही भारतात आर्थिक विषमता आणि असमानतेमुळे विकास दरावर परिणाम होत असल्याचे म्हटले आहे.

'वर्ल्ड इनइक्विलिटी लॅब'च्या २०२४ च्या अहवालानुसार, भारतात आघाडीच्या एक टक्के लोकांकडे देशाची ४०.१ टक्के मालमत्ता आहे आणि त्यांचा उत्पन्नातील वाटा २२.६ टक्के आहे. त्याचवेळी कनिष्ठ पातळीवर ५० टक्क्यांपेक्षा कमी वर्गाकडे केवळ ६.४ टक्के मालमत्ता आहे. याचाच अर्थ भारतातील आर्थिक विषमता ऐतिहासिक आणि उच्चांकी पातळीवर पोचली आहे. ही स्थिती केवळ आकड्यापुरतीच मर्यादित नसून रस्ते, गाव आणि ग्रामीण भागावर स्पष्टपणे जाणवत आहे. एकीकडे आलिशान मॉल, गगनचुंबी इमारती उभ्या राहात असताना त्याच्या बाजूला झोपडपट्ट्याही दिसतात. हे प्रगतीचे चित्र फसवे आहे.

वस्तुतः जगातील अनेक देशांनी असमानता दूर करणे शक्य असल्याचे दाखवून दिले आहे. स्वीडन, नॉर्वे, डेन्मार्क देशांनी उच्च कर व्यवस्था आणि कल्याणकारी धोरणांच्या मदतीने सर्व नागरिकांना समान संधी दिली. तसेच शिक्षण आणि आरोग्य सेवा मोफत करून रोजगाराच्या संधी सर्वांना समप्रमाणात उपलब्ध करून दिली. चीनमध्येही शिक्षण आणि पायाभूत सुविधांवर मोठी गुंतवणूक करण्यात आली असून कोट्यवधी लोकांना गरिबीतून बाहेर काढले आहे. याउलट भांडवलशाहीची जननी असणार्या अमेरिकेत असामनता वाढत असून सामाजिक तणाव वाढत आहे.

भारताचा विचार केल्यास केरळमधील शिक्षण आणि आरोग्य धोरण संपूर्ण देशासाठी आदर्श आहे. महिला बचत गटांनी ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठी शक्ती दिली आहे. आयुष्मान भारतसारख्या योजनांनी आरोग्य सेवेला गरिबांपर्यंत पोचवले आहे. तरीही आर्थिक असमानता असून ती दरी भरून काढण्यासाठी सर्वसामान्यांचे सशक्तीकरण करणे गरजेचे आहे. प्रत्येक मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळण्यासाठी सरकारी शाळा आणि महाविद्यालयांचा आराखडा सक्षम करणे क्रमप्राप्त आहे. स्वस्तात आरोग्य सेवा उपलब्ध करून दिल्यास गरिबांना उपचारासाठी कर्ज घेण्याची वेळ येणार नाही. लहान उद्योग आणि स्वयंरोजगारांना सरकारी पाठबळ दिल्यास त्यांचे आर्थिक सक्षमीकरण होईल. देशातील अतिश्रीमंतावर योग्य कर आकारत त्याचा वापर गरिबांच्या शिक्षणासाठी आणि आरोग्यव्यवस्था सुदृढ बनवण्यावर करायला हवा.



देशातील नागरिकांचे दरडोई उत्पन्न वाढले पाहिजे. भारतात १९९० मध्ये दरडोई उत्पन्न सुमारे ३६० डॉलर होते ते आज वाढत २०२५ मध्ये २७०० डॉलर झाले आहे. हे स्वागतार्ह मानायचे का याबाबत चीनची तुलना करून पाहायला हवी. १९९०मध्ये दोन्ही देशातील दरडोई उत्पन्न हे जवळपास सारखेच होते. परंतु २०२५ मध्ये चीनचे दरडोई उत्पन्न हे १३ हजार डॉलरपर्यंत पोचले आहे. हे प्रमाण भारताच्या तुलनेत पाच पट अधिक आहे. १९९० मध्ये भारत आणि चीन यांच्यातील दरडोई उत्पन्नाची क्रमवारी समान होती. मात्र २०२५ मध्ये भारत १९७ देशांच्या यादीत १४१व्या स्थानावर तर चीन ७०व्या स्थानावर आहे. यावरून आपल्याला आर्थिक धोरणांबाबत पुनर्विचार करायला हवा हे लक्षात येते.

# सर्पदंशावर हाफकीन महामंडळाच्या लसीचा प्रभावी उतारा, जनजागृती मोहीम

पूरपरिस्थितीत हाफकीनच्या सर्पदंश लसी प्रभावी ठरणार

राज्य सरकार हाफकीनकडून खरेदी करणार दीड लाख लस

येत्या काही दिवसात राज्यभरातील सरकारी रुग्णालयात सर्पदंशाच्या लस उपलब्ध होऊन सर्पदंश आणि लसीबाबत जनजागृती मोहिम

मुंबई/ नीता परब: राज्यभर पावासाने थैमान घातले आहे. त्यात मराठवाड्यात पावसामुळे सर्प, विंचू प्राणी घराघरात आढळून येत आहेत. याचबरोबर ठाणे जिल्ह्यातील सर्पदंश रुग्णांमध्ये अलीकडे वाढ झाली आहे. सर्पदंशामुळे अनेकांना जीव गमवावे लागले आहेत. याचबरोबर येत्या काही दिवसात ऑक्टोबर तडाख्याला देखील सुरुवात होणार आहे ज्यात सर्प आढळून येण्याचे प्रमाण वाढते.




याच पार्श्वभूमीवर राज्य सरकारने सकारात्मक निर्णय घेत, हाफकीन संस्थेकडील सर्पदंशावरील तयार असलेली दीड लाख प्रभावी व परिणामकारक लसींची खरेदी महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणाने हाफकीनमार्फत करावी,अशा सूचना उपमुख्यंत्री अजित पवार यांनी मंगळवारी दिल्या आहेत. या निर्णयामुळे महाराष्ट्र राज्यातील सरकारी रुग्णालयांमध्ये येत्या काही दिवसात या लसी उपलब्ध होतील असे हाफकीनच्या व्यवस्थापकीय संचालकांकडून सांगण्यात येत आहे. प्रभावी लस व योग्य वेळेत उपाचारामुळे नागरिकांचे जीव वाचण्यास मोलाची मदत होईल हे मात्र निश्चित.

हाफकीन संस्थेचे सर्पदंश औषध वर्षानुवर्षे गुणवत्ताधारक

हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळाचे सर्पदंश प्रतिविष (अँटी स्नेक व्हेनम सिरम) हे औषध पोलीव्हॅलेंट आहे. सर्व प्रकारच्या विषारी सापांवरती हे औषध परिणामकारक आहे. भारतामधील कोणत्याही भागातील कोणत्याही प्रकारचा विषारी सापाचा दंश जरी झाला तरी त्यावर हे औषध परिणामकारक आहे.

भारतामध्ये मुख्यतः नाग, मण्यार, घोणस, फुरसे या चार सापांच्या प्रजाती या विषारी आहेत; इतर प्रकारचे साप हे बिनविषारी या प्रकारात मोडले जातात. सर्पदंश झालेला रुग्ण उपचारासाठी दवाखान्यात गेल्यावर तेथील डॉक्टर कोणत्या प्रकारचा साप चावला हे विचारतात आणि त्यानुसार उपचार करतात.

हाफकीन संस्थेचे सर्पदंश प्रतिविष औषध पोलीव्हॅलेंट

हाफकीन महामंडळाचे सर्पदंश प्रतिविष हे इंजेक्शन सर्व प्रकारच्या विषारी सापांवर गुणकारक आहे. हाफकिन महामंडळाच्या सर्पदंश प्रतिविष या औषध गुणकारी असल्याने रुग्ण लवकर बरा होतो आणि कमी डोस मध्ये रुग्णाचा जीव वाचतो. पद्मश्री डॉक्टर प्रकाश आमटे हे १९७४ सालापासून हाफकिन महामंडळाचे सर्पदंश प्रतिविष औषध वापरून हेमलकसा येथील रुग्णांचे जीव वाचवत आहेत.

इंजेक्शन तयार करण्याच्या प्रक्रियेला लागतात नऊ महिने हाफकीन महामंडळाचे सर्पदंश प्रतिविष इंजेक्शन हे घोड्यांच्या रक्तांपासून बनते या प्रक्रियेला नऊ महिने लागतात. हे औषध लाईफोलाइज या फ्रान्स तंत्रज्ञानाच्या आधारे बनत असल्यामुळे ते शीतगृहामध्ये किंवा रेफ्रिजरेटर मध्ये ठेवायची गरज नसते; सामान्य तापमानात देखील हे औषध राहते. त्यामुळे सर्पदंश प्रतिविष इंजेक्शन आपण कपाटामध्ये किंवा बॅगेमध्ये ठेवू शकतो. डोंगराळ प्रदेशात ट्रेकिंगला जाताना किंवा जंगल सफारी करताना सर्पदंश प्रतिविष इंजेक्शन स्वतःजवळ ठेवण्यात यावे, असा सल्ला तज्ज्ञ देतात. रुग्णांना मिळतेय जीवनदान!

‘सध्या हाफकीनकडे सर्पदंशावरील दीड लाख लस तयार आहेत. सर्पदंशावरील हाफकीनने तयार केलेली लस प्रभावी व परिणामकारक आहे. या लसींची खरेदी महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणाने हाफकीनमार्फत करण्यात येणार आहे. ज्या-ज्यावेळी देश अथवा राज्यावर कोणतीही नैसगिर्क आपत्ती आली, त्यावेळी हाफकीन महामंडळाने नेहमीच वैद्यकीय मदत केली आहे. हाफकीन संस्थेची लसीची गुणवत्ता विश्वासार्हतामुळे रुग्णांना जीवदान मिळत आहे, ही बाब हाफकीन संस्थेसाठी सकारात्मक आहे.

## जागतिक शाकाहारी दिन : पनीर ६५ पासून पनीर लबाबादारपर्यंत पनीरच्या या सहज, सोप्या अन् चविष्ट रेसिपीज घरी ट्राय तर करा

दरवर्षी १ ऑक्टोबर रोजी जागतिक शाकाहारी दिन साजरा केला जातो. शाकाहाराबाबत आपल्या मनात येणारा एक नेहमीचा प्रश्न म्हणजे- शाकाहारी लोक प्रथिने किंवा प्रोटीन्स कुठून मिळवतात? याचे उत्तर अनेकांना माहीत असते. सगळ्यांचा आवडता पदार्थ आणि जो शतकानुशतके भारतीय स्वयंपाकघरांमध्ये ज्याचा वापर होतो, ते म्हणजे पनीर. प्रथिने, कॅल्शियम आणि अन्य आवश्यक पोषक घटकांनी समृद्ध असलेले पनीर ताकद, ऊर्जा आणि उत्साह राखण्यास मदत करते. जेवणात त्याचा समावेश केल्याने केवळ पौष्टिक, संतुलित आहारच मिळत नाही तर शाकाहारी आहारात वैविध्यासोबतच तो रुचकर देखील होतो. पनीरच्या आरोग्यदायी फायद्यांसोबतच चवीबद्दल शेफ तेजा परुचुरी म्हणतात, पनीर हा एक असा घटक आहे जो अनेक पाककृतींमध्ये वापरता येतो. तो ग्रील्ड, स्टिअर-फ्राईड, सॅलडमध्ये टाकून, करीमध्ये मिसळून किंवा पक्वान्नातही वापरला जातो. आणि या सगळ्या पदार्थात घातल्यानंतरही त्याची चव खूप छान असते. वेगवेगळ्या पाककृतींमध्ये पनीरचा वापर केल्याने, त्या पदार्थांमध्ये वेगवेगळ्या राज्यांचे स्वाद मिसळले जातात. यामुळे पदार्थ रुचकरही बनतो आणि पोषकही. दक्षिण भारतीय शैलीतील पालक पनीर नारळाच्या दुधासह पालक पनीर या आवडत्या उत्तर भारतीय पदार्थात नारळाच्या दुधामुळे एक वेगळीच खास चव येते. उकळत्या पाण्यात थोडा वेळ पालक शिजवून घेऊन त्याची प्युरी करून घ्यावी. मोहरी, कढीपत्ता आणि लाल मिरची त्यात घातली जाते. पनीर घातल्याने थोडी उग्र असलेल्या या भाजीला एक वेगळीच चव येते आणि क्रिमी स्मूथिंगसाठी नारळाचे दूध आहेच. जीरा भात, परोठा, नीर डोसा किंवा डोश्यासोबत ते चांगले लागते. रेसिपीची लिंक पनीर चिली ६५ ही एक इंडो-फ्यूजन डिश आहे. यात कुरकुरीत तळलेले पनीर लसूण, कढीपत्ता आणि आशियातील खास चवींच्या मिश्रणासह एकत्र केले जाते. केचप, चिली सॉस, सोया आणि मध एकत्र करून चवीचे योग्य ते संतुलन केले जाते. ज्यामुळे ते एक अप्रतिम नाश्ता ठरते. पराठा, फ्राईड राईस किंवा लसूण नानसह एक योग्य पर्याय ठरतो. रेसिपीची लिंक पनीर चिली ६५ पनीर चिली ६५ ही एक इंडो-फ्यूजन डिश आहे. यात कुरकुरीत तळलेले पनीर लसूण, कढीपत्ता आणि आशियातील खास चवींच्या मिश्रणासह एकत्र केले जाते. केचप, चिली सॉस, सोया आणि मध एकत्र करून चवीचे योग्य ते संतुलन केले जाते. ज्यामुळे ते एक अप्रतिम नाश्ता ठरते. पराठा, फ्राईड राईस किंवा लसूण नानसह एक योग्य पर्याय ठरतो. रेसिपीची लिंक मसाला पोडीसोबत कुरकुरीत पनीर पॉपकॉर्न मसाला पोळीसोबत कुरकुरीत पनीर पॉपकॉर्न हा नाश्त्यासाठी एकदम योग्य पदार्थ आहे.

## बीटचा रस पोटासाठी ठरेल अमृत! चवीसोबत संपूर्ण शरीर राहाल कायमच निरोगी,पचनाच्या समस्या होतील गायब

शरीर कायमच निरोगी राहण्यासाठी अनेक गोष्टी केल्या जातात. आहारात पौष्टिक पदार्थांचे सेवन, व्यायाम, ध्यान, भरपूर पाण्याचे सेवन इत्यादी अनेक गोष्टी केल्या जातात. पण बऱ्याचदा धावपळीच्या जीवनशैलीमुळे शरीराची काळजी घ्याल जास्त वेळ मिळत नाही. सतत काम करत राहिल्यामुळे आरोग्य पूर्णपणे बिघडून जाते. धावपळीच्या जीवनशैलीत शरीराची काळजी घेण्यासाठी सकाळी उठल्यानंतर नियमित एक ग्लास बीटच्या रसाचे सेवन करावे. बीटचा रस प्यायल्यास शरीरात साचून राहिलेले विषारी घटक बाहेर पडून जातात आणि आरोग्य सुधारते. बीटचा रस आरोग्यासाठी वरदान आहे. यामध्ये लोह, फॉलिक ॲसिड, मॅग्नेशियम, पोटॅशियम, जीवनसत्त्व सी, फायबर तसेच अँटी ऑक्सिडंट्स इत्यादी अनेक घटक आढळून येतात. त्यामुळे सकाळी उठल्यानंतर नियमित एक ग्लास बीटचा रस प्यायल्यास आतड्यांमध्ये साचलेली घाण बाहेर पडून जाईल आणि शरीर स्वच्छ होईल.



लहान मुलांपासून अगदी मोठ्यांपर्यंत अनेकांना बीटचा रस प्यायला अजिबात आवडत नाही. अशावेळी तुम्ही मुलांना बीटची भाजी, सॅलड किंवा सरबत बनवून पिण्यास देऊ शकता. यामुळे मुलांच्या शरीराला भरपूर पोषण मिळेल. बीटचा रस प्यायल्यामुळे शरीराची ताकद वाढते आणि रक्त शुद्ध होण्यास मदत होते. शरीरात निर्माण झालेली रक्ताची कमतरता भरून काढण्यासाठी नियमित बीटच्या रसाचे सेवन करावे. यामुळे नवीन रक्तपेशी तयार होण्यास मदत होते आणि आरोग्य सुधारते. हिमोग्लोबिनची पातळी कमी झाल्यानंतर शरीरात सतत थकवा, अशक्तपणा जाणवू लागतो, अशावेळी उपाशी पोटी महिनाभर नियमित बीटचा रस प्यायल्यास शरीराला भरपूर ताकद आणि शक्ती मिळेल.

बीटचा रस केवळ आरोग्यासाठीच नाहीतर त्वचा आणि केसांसाठी सुद्धा प्रभावी ठरतो. अँटी ऑक्सिडंट्स आणि विटामिन सी त्वचेमध्ये जमा झालेली घाण बाहेर काढून टाकण्यास मदत करतात. यामुळे त्वचेवर चमकदार ग्लो येतो आणि चेहरा अतिशय सुंदर दिसतो. चेहऱ्यावर वाढलेले पिंपल्स कमी करण्यासाठी बीटचा रस प्यावा. यामुळे त्वचेवर वाढलेला काळे डाग, पिगमेंटेशन आणि त्वचेच्या इतर सर्वच समस्यांपासून आराम मिळतो. केस गळणे, केसांमध्ये वाढलेला कोंडा आणि केसांच्या इतर सर्वच समस्यांपासून आराम मिळवण्यासाठी बीट, गाजर आणि सफरचंद रस प्यावा. शरीरात साचून राहिलेले घाणेरडे कोलेस्ट्रॉल हृदयाला हानी पोहचवते. रक्तवाहिन्यांमध्ये कोलेस्ट्रॉल जमा झाल्यानंतर कोणत्याही क्षणी हार्ट अटॅक किंवा हार्ट स्ट्रोक येण्याची शक्यता असते. त्यामुळे बीटचा रस नियमित प्यायल्यास शरीरात जमा झालेली घाणेरडे कोलेस्ट्रॉल कमी होण्यास मदत होईल. यामध्ये असलेले नायट्रेट्स रक्तवाहिन्या स्वच्छ करते. शरीराची ऊर्जा वाढवण्यासाठी खेळाडू नियमित बीटच्या रसाचे सेवन करतात. यामध्ये असलेल्या फायबरमुळे पचनक्रिया सुधारते आणि कधीच बद्धकोष्ठतेचा त्रास होत नाही.

## घरी बनवा केरळ स्टाईल मलबार चिकन फ्राय, मसालेदार आणि कुरकुरीत चव; लगेच तोंडाला आणेल पाणी

केरळच्या मलबार किनाऱ्यावरील खाद्यसंस्कृती भारतभर प्रसिद्ध आहे. मलबार मसाले, नारळाचे तेल, तिखटपणा आणि खास सुगंधी मसाल्यांचा वापर ही या पाककृतीची वैशिष्ट्ये आहेत. यातीलच एक फेमस डिश म्हणजे मलबार चिकन फ्राय जो चवीला एकदम मसालेदार आणि कुरकुरीत असा लागतो. विकेंडला घरी काही खास बनवायचं असल्यास ही डिश तुमच्यासाठी एक उत्तम पर्याय आहे.

मलबार चिकन फ्राय ही डिश मसालेदार, खमंग आणि करकरीत असते. यामध्ये चिकनला लालसर रंग आणण्यासाठी काश्मिरी मिरच्या वापरल्या जातात, तर मसाल्यांमध्ये आले, लसूण, कांदा, लिंबाचा रस आणि सुगंधी मसाले घालून चिकन तळले जाते. केरळमध्ये ही डिश परोट्टा, नीर दोसा किंवा साध्या भातासोबत नेहमी सर्व्ह केली जाते. दक्षिण भारतीय घराघरात ही रेसिपी खास पार्टी किंवा सणावारी बनवली जाते. कोणत्या खास प्रसंगी कुटुंबाला खुश करण्यासाठी तुम्ही ही रेसिपी घरी ट्राय करु शकता.चला तर मग मलबार चिकन फ्राय बनवण्यासाठी लागणारे साहित्य आणि कृती जाणून घेऊया.

साहित्य चिकन – ५०० ग्रॅम (मध्यम तुकडे)

कांदा – २ (बारीक चिरलेले)

आले-लसूण पेस्ट – २ चमचे

काश्मिरी लाल मिरची पावडर – २ चमचे

हळद – ट चमचा

धने पावडर – १ चमचा

गरम मसाला – १ चमचा

मिरी पावडर – ट चमचा

लिंबाचा रस – २ चमचे

मीठ – चवीनुसार

कढीपत्ता – १०-१२ पाने

नारळाचे तेल (किंवा साधे तेल) – तळण्यासाठी

व्हेज पदार्थाला द्या शाही तडका, घरच्या घरी बनवा रेस्टॉरंट स्टाईल परफेक्ट ‘पनीर बिर्याणी’





कृती यासाठी सर्वप्रथम एका मोठ्या भांड्यात चिकनचे तुकडे घ्या. त्यात आले-लसूण पेस्ट, मिरची पावडर, हळद, धने पावडर, मिरी, लिंबाचा रस व मीठ घालून

व्यवस्थित मिक्स करा. किमान १ तास मॅरिनेट होऊ द्या.

कढईत नारळाचे तेल गरम करून त्यात बारीक चिरलेले कांदे सोनेरी होईपर्यंत तळा.

कांद्यात सुगंधासाठी कढीपत्ता टाकून १ मिनिट परता.

मॅरिनेट केलेले चिकन थोडेथोडे करून कढईत टाका आणि मध्यम आचेवर तळा.

चिकन पूर्णपणे तळून घेताना अधूनमधून झाकण ठेवून वाफ आणा, त्यामुळे मसाला आतपर्यंत जाईल.


चिकन बाहेरून लालसर आणि करकरीत दिसू लागले की ते तयार झालेले असते.

गरमागरम मलबार चिकन फ्राय कांदा, लिंबाचे फोडी आणि भात/परोट्टा सोबत सर्व्ह करा.

ही डिश केरळच्या खासियतपैकी एक असून मसालेदार खाणाऱ्यांसाठी उत्तम पर्याय आहे.

## वारंवार होणाऱ्या डोकेदुखीमुळे त्रस्त आहात? मग ‘हे’ घरगुती उपाय करून मिळवा आराम, डोकेदुखी होईल कायमची गायब

धावपळीची जीवनशैली, कामाचा वाढलेला तणाव, आहारात होणारे बदल, मानसिक तणाव, पाण्याची कमतरता, शारीरिक हालचालींचा अभाव, जंक फूडचे अतिसेवन इत्यादी अनेक गोष्टींचा परिणाम आरोग्यावर लगेच दिसून येतो. त्यामुळे शरीराची योग्य काळजी घेणे आवश्यक आहे. सतत वाढलेल्या तणावामुळे आणि कामामुळे डोकेदुखीची समस्या उद्भवते. डोकेदुखी अतिशय सामान्य समस्या आहे. पण यामुळे काहीवेळा उलट्या, अस्वस्थता वाढू लागते. शरीरात वाढलेल्या पित्तामुळे सुद्धा डोकं दुखत. कामावर लक्ष केंद्रित करताना अनेक अडथळे निर्माण होतात. वारंवार होणारे डोकेदुखी कमी करण्यासाठी अनेक लोक मेडिकलमधील गोळ्या औषधांचे सेवन करतात. पण पेनकिलरच्या गोळ्यांमुळे किडनी निकामी होणे किंवा किडनीच्या आरोग्याला हानी पोहचण्याची जास्त शक्यता असते.



वारंवार डोकं दुखण्यास सुरुवात झाल्यानंतर मानेमध्ये वेदना होतात. याशिवाय शरीरात निर्माण झालेल्या पाण्याच्या कमतरतेमुळे डिहायड्रेशनची समस्या उद्भवते. याशिवाय तासनतास मोबाईल स्क्रीन, लॅपटॉप, झोपेचा अभाव, चुकीचा आहार इत्यादी अनेक गोष्टींचा परिणाम मेंदूच्या आरोग्यावर होतो आणि डोकं दुखू लागते. शरीरात जमा झालेल्या पित्तामुळे डोकं दुखणे, उलट्या होणे किंवा मळमळ वाटू लागते. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला वारंवार होणाऱ्या डोकेदुखीपासून आराम मिळवण्यासाठी कोणते घरगुती उपाय करावेत, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. हे उपाय केल्यामुळे तात्काळ डोकेदुखीपासून आराम मिळेल आणि शरीराला सुद्धा फायदे होतील.

डोके दुखीपासून आराम मिळवण्यासाठी करा ‘हे’ घरगुती उपाय: डोकेदुखीपासून आराम मिळवण्यासाठी भरपूर पाण्याचे सेवन करावे. कारण पाण्याच्या कमतरतेमुळे डिहायड्रेशन होते आणि शरीरात सतत थकवा, अशक्तपणा जाणवू लागतो. त्यामुळे भरपूर पाणी प्यावे. तसेच आल्याचे चाटण खाल्ल्यास डोकेदुखीपासून सुटका मिळेल. यासाठी किसलेल्या आल्याचा रस काढून त्यात मध मिक्स करा आणि आल्याचे रसाचे सेवन करावे. नंतर काही वेळाने कोमट पाण्याचे सेवन केल्यास डोकेदुखीच्या समस्येपासून आराम मिळेल. आलं मधाचे चाटण खाल्ल्यानंतर जड झालेले डोकं हलके होते. यामुळे डोक्याच्या स्नायूंना आराम मिळतो.

डोकेदुखीवर अतिशय प्रभावी उपाय म्हणजे गरम पाण्याची पट्टी. ही पट्टी मान आणि डोक्याच्या मागच्या बाजूला बांधून ठेवा. यामुळे मानेचे आखडलेले स्नायू रिलॅक्स होण्यास मदत होईल. गरम पाण्याच्या पिशवीचा शेक घेतल्यामुळे रक्ताभिसरण सुधारून तणाव कमी होतो. धावपळीच्या जीवनशैलीमुळे काहीवेळा व्यवस्थित झोप पूर्ण होत नाही. झोपेची कमतरता निर्माण झाल्यानंतर शरीरात थकवा आणि अशक्तपणा जाणवू लागतो. या सर्व समस्यांपासून आराम मिळवण्यासाठी शांत आणि आरामदायी झोप घेणे आवश्यक आहे. डोके दुखी केवळ डॉक्टरांच्याबी गोळ्या औषधांची नाहीतर घरगुती उपाय करून सुद्धा बरी होते. नियमित व्यायाम, संतुलित आहार आणि पुरेशी झोप घेतल्यास डोकेदुखीची समस्या कायमची दूर होईल.

## दसऱ्यानिमित्त घरी बनवा चमचमीत शाही व्हेज पुलाव! मऊ आणि मोकळा भात शिजण्यासाठी फॉलो करा ‘या’ सोप्या टिप्स

नवरात्रीच्या दहाव्या दिवशी सगळीकडे दसरा सण साजरा केला जातो. दसऱ्याच्या दिवशी रावणाचे दहन केले जाते. याशिवाय घरात सरस्वतीपूजन आणि आपट्याच्या पानांची पूजा करून गोड नैवैद्य बनवला जातो. दसऱ्याच्या शुभेच्छा देण्यासाठी घरात असंख्य पाहुणे येतात. घरी आलेल्या पाहुण्यांसाठी काहींना काही खास रेसिपी बनवून पाहुण्यांचे स्वागत केले जाते. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला सोप्या पद्धतीमध्ये चवचमीत शाही व्हेज पुलाव बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. वेगवेगळ्या भाज्या, मसाले आणि तांदळाचा वापर करून बनवलेला चमचमीत पुलाव घरातील सगळ्यांचं खूप जास्त आवडेल. पुलावचे नाव ऐकल्यानंतर सगळ्यांच्या तोंडाला पाणी सुटते. याशिवाय घाईगडबडीच्या वेळी सुद्धा नेमकं काय बनवावं सुचत नसेल तर तुम्ही व्हेज पुलाव बनवू शकता. जाणून घ्या व्हेज पुलाव बनवण्याची सोपी रेसिपी.



साहित्य:

तांदूळ

कांदा टोमॅटो

शिमला मिरची

फ्लॉवर

बीन्स

हिरवी मिरची आलं लसूण पेस्ट

मोहरी

जिरं

लाल तिखट हळद गरम मसाला दही

कृती: व्हेज पुलाव बनवण्यासाठी सर्वप्रथम, टोपात तेल गरम करून त्यात मोहरी, जिरं, कढीपत्ता आणि हिंग टाका.

त्यानंतर त्यात कांदा आणि टोमॅटो टाकून मिक्स करा. त्यानंतर त्यात चवीनुसार मीठ टाकून कांदा शिजण्यासाठी ठेवा.

कांदा टोमॅटो शिजून मऊ झाल्यानंतर त्यात हिरव्या मिरचीची पेस्ट घालून व्यवस्थित भाजून घ्या. त्यानंतर त्यात हळद, गरम मसाला, लाल तिखट, पुलाव मसाला घालून सर्व मसाले व्यवस्थित भाजून घ्या.

मसाले भाजल्यानंतर त्यात एक किंवा दोन चमचे दही टाकून मिक्स करा. त्यामुळे ग्रेव्ही तयार होईल.

दही व्यवस्थित भाजल्यानंतर त्यात चिरून घेतलेल्या भाज्या टाकून मंद आचेवर एक वाफ करून घ्या. त्यानंतर त्यात गरम पाणी टाकून पाण्याला एक उकळी काढा.

पाण्याला उकळी आल्यानंतर त्यात भिजवलेले तांदूळ टाकून मिक्स करा आणि भात शिजण्यासाठी ठेवा. भात व्यवस्थित शिजल्यानंतर सगळ्यात शेवटी बारीक चिरलेली कोथिंबीर टाकून सर्व्ह करा.

तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेला चमचमीत शाही व्हेज पुलाव. हा पदार्थ आंबट लोणचं किंवा दह्याच्या कोशिंबीरसोबत सुंदर लागेल.

# लातूरात सेवानिवृत्त परिचर्या अधिकारी कर्मचाऱ्यांचा सन्मान

लातूर :–:दि. १० व ११ ऑक्टोबर २०२५ रोजी लातूर येथील लक्ष्मी ग्रॅन्ड मंगल कार्यालयात, ट्रेन्ड नर्सेस असोसिएशन ऑफ इडिया, च्या महाराष्ट्र राज्य शाखेकडून विद्यार्थी परिचारीका संघटनेचे द्विवार्षिक अधिवेशन आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ट्रेंड नर्सेस असोसिएशन ऑफ इंडिया चे उपाध्यक्ष श्री दिपकमल, महाराष्ट्र शाखेचे अध्यक्ष राजाभाऊ राठोड, सचिव रत्ना देवरे, श्वेता दाभोळकर व सर्व पदाधिकारी, स्टुडेंट नर्सेस असोसिएशन राज्य सल्लागार शिल्पा शेट्टीगार व सर्व पदाधिकारी, महाराष्ट्र परिचर्या परिषदेचे उपाध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य परिचारीका संघटना, मुख्यालय लातूर संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष श्री अरुण कदम व राज्य सरचिटणीस श्रीमती सुमित्रा तोटे, विलासराव देशमुख अतिविशेषोपचार रुग्णालयाच्या अधिसेविका श्रीमती अमृता पोहरे, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या अधिसेविका श्रीमती लक्ष्मीबाई आपटे, एम आय टी. परिचर्या महाविद्यालयाचे प्राचार्य श्री सर्वानंद इत्यादींची व्यासपीठावर उपस्थिती होती. या दोन दिवसीय अधिवेशनामध्ये राज्याती परिचर्या महाविद्यालये तसेच आर्मी ऑफिसर, आर्मी नर्सिंग चे विद्यार्थी यांनी सहभाग घेतला. त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या विविध क्रिडा स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, नाटिका, एकांकिकाचे करण्यात आले. स्पर्धेतील विजेते विद्यार्थी, उत्कृष्ट विद्यार्थी व उत्कृष्ट शिक्षकांनाही विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. विशेषत लातूर येथील सेवानिवृत्त परिचर्या अधिकारी कर्मचाऱ्यांचा सन्मानित करण्यात आले. यामध्ये अधिसेविका, श्रीमती कांता जाधव, श्रीमती आनंदी आल्टे, श्रीमती मथुरा मोरे, श्रीमती सुभद्रा डोळस, श्रीमती अरुणा सोनार, श्रीमती अरुणा सोनार, श्रीमती राजश्री हरंगुळे, परिसेविका श्रीमती अरुणा मदने, श्रीमती पंचफुला डावळे, श्रीमती शकुंतला शिंदे, श्रीमती प्रतिभा पवार, श्रीमती कुसुम भोसेकर, श्री श्रीरंग गायकवाड इत्यादींचा सन्मान करण्यात आला. सर्व संस्थेच्या प्राचार्यांचाही सन्मान करण्यात आला. यात श्रीमती कुमुदिनी कदम यांचाही समावेश होता. कार्यक्रमादरम्यान श्री अरुण कदम यांचे प्रेरणादायी भाषण झाले. तसेच श्रीमती राजश्री हरंगुळे यांनी आभार मानले. यावेळी एस एन एस आय व ट्रेंड नर्सेस असोसिएशन ऑफ इंडिया महाराष्ट्र ब्रँच चे सर्व पदाधिकारी राज्यभरातून उपस्थित झाले होते. तसेच महाराष्ट्र राज्य परिचारीका संघटना, शाखा लातूर चे श्री अमित मलिशे, सुधाकर केदार, शुभम वानखेडे, अनंत पवार, श्रीमती कुमुदिनी कदम, व इतर पदाधिकारी व सभासदांची उपस्थिती होती.

## आदर्श व्यक्तिमत्त्व माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांना माजी आ. शिवाजीराव पाटील कव्हेकरांकडून वाढदिवसानिमित्त शुभेच्छा



लातूर दि.१३–१०–२०२५ देशाचे माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपा नेते तथा राष्ट्रीय किसान मोर्चा गुजरात व गोवा राज्याचे प्रभारी माजी आ. शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी त्यांना दुरध्वनीवरून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

भाजपा नेते तथा राष्ट्रीय किसान मोर्चा गुजरात व गोवा राज्याचे प्रभारी माजी आमदार शिवाजीराव पाटील कव्हेकर साहेब हे केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांना गुरुतुल्य व ऋषीतुल्य व्यक्तिमत्व मानतात. त्यांच्या एकूण कार्यावर कव्हेकर साहेबांची खूप निष्ठा आहे. त्यांच्याशी अनेकवेळा वैचारिक चर्चा होते त्यामुळे त्यांनी पंजाबचे माजी राज्यपाल तथा केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर साहेब यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांना शुभेच्छा दिल्या. तसेच देशाच्या वाटचालीमध्ये आपले अमुल्य योगदान लाभलेले आहे. आपल्या केंद्रीय गृहमंत्री पदाच्या व विविध पदाच्या कार्यकाळात आपण देशाच्या प्रगतीसाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतलेले आहेत. त्यामुळे यापुढील कालावधीतही देशाच्या वाटचालीमध्ये आपले मोलाचे मार्गदर्शन लाभो, ही साईबाबांच्या चरणी प्रार्थना. अशी भावनाही माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी दुरध्वनीवरून बोलताना व्यक्त केली.

# पंचायत समिती सभापती पद आणि जिल्हा परिषद निवडणूक विभागाचे आरक्षण जाहीर

लातूर, दि. १३ (जिमाका): जिल्ह्यातील सर्व पंचायत समिती सभापती, जिल्हा परिषद सदस्य पदाच्या आरक्षण निश्चितीसाठी आज जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात आरक्षण सोडतीचे आयोजन करण्यात आले होते.




यावेळी अपर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, सामान्य प्रशासनचे उपजिल्हाधिकारी गणेश पवार यांच्यासह अधिकारी, कर्मचारी व नागरिक यावेळी उपस्थित होते. लातूर जिल्ह्यातील पंचायत समित्यांच्या सभापती आरक्षण सोडतीमध्ये निलंगा पंचायत समितीचे सभापती पद अनुसूचित जाती (महिला), औसा पंचायत समितीचे सभापती पद अनुसूचित जाती, उदगीर आणि चाकूर पंचायत समितीचे सभापती पद नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला), लातूर पंचायत समितीचे सभापती पद नागरिकांचा मागास प्रवर्ग, जळकोट आणि रेणापूर पंचायत समितीचे सभापती पद सर्वसाधारण (महिला), देवणी, अहमदपूर, शिरूर अनंतपाळ पंचायत समितीचे सभापती पद सर्वसाधारण प्रवर्गासाठी आरक्षित झाले आहे.

या सोडतीमध्ये जिल्हा परिषद निवडणूक विभागांचे आरक्षण खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आले– १) अहमदपूर तालुक्यातील जिल्हा परिषद निवडणूक विभाग– खंडाळी– नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) हाडोळती – सर्वसाधारण शिरुर ताजबंद– अनुसूचित जाती अंधोरी– सर्वसाधारण किनगाव– नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) सावरगाव रोकडा – अनुसूचित जमाती २) जळकोट तालुक्यातील जिल्हा परिषद निवडणूक विभाग– वांजरवाडा– सर्वसाधारण माळहिप्परगा– सर्वसाधारण (महिला) गुत्ती– अनुसूचित जाती (महिला) ३) उदगीर तालुक्यातील जिल्हा परिषद निवडणूक विभाग– वाढवणा बु.– नागरिकांचा मागास प्रवर्ग सोमनाथपूर– अनुसूचित जाती (महिला) नळगीर – अनुसूचित जाती (महिला) निडेबन – अनुसूचित जाती लोहारा – अनुसूचित जाती हेर– अनुसूचित जाती तोगरी– सर्वसाधारण ४) देवणी तालुक्यातील जिल्हा परिषद निवडणूक विभाग– बोरोळ – नागरिकांचा मागास प्रवर्ग वलांडी – सर्वसाधारण (महिला) जवळगा– सर्वसाधारण ५) शिरुर अनंतपाळ तालुक्यातील जिल्हा परिषद निवडणूक विभाग– येरोळ – अनुसूचित जाती (महिला) साकोळ – अनुसूचित जाती ६) चाकूर तालुक्यातील जिल्हा परिषद निवडणूक विभाग– जानवळ– नागरिकांचा मागास प्रवर्ग चापोली– नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) रोहिणा – अनुसूचित जाती (महिला) वडवळ (ना.)– नागरिकांचा मागास प्रवर्ग नळेगाव– सर्वसाधारण ७) रेणापूर तालुक्यातील जिल्हा परिषद निवडणूक विभाग– पानगाव – नागरिकांचा मागास प्रवर्ग खरोळा – सर्वसाधारण (महिला) कामखेडा – सर्वसाधारण (महिला) पोहरेगाव – सर्वसाधारण (महिला) ८) लातूर तालुक्यातील जिल्हा परिषद निवडणूक– आर्वी– सर्वसाधारण (महिला) भातांगळी– नागरिकांचा मागास प्रवर्ग महाराणा प्रतापनगर– अनुसूचित जाती पाखरसांगवी– नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) हरंगुळ बु. – सर्वसाधारण (महिला) काटगाव – सर्वसाधारण (महिला), तांदुळजा – नागरिकांचा मागास प्रवर्ग मुरुड बु.– नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) निवळी– अनुसूचित जाती (महिला) एकुर्गा– सर्वसाधारण ९) औसा तालुक्यातील जिल्हा परिषद निवडणूक– लोदगा – सर्वसाधारण (महिला) आलमला – नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) खरोसा – सर्वसाधारण लामजना – नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) भादा – नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) उजनी – सर्वसाधारण आशिव – सर्वसाधारण (महिला) मातोळा – सर्वसाधारण (महिला) किल्लारी – सर्वसाधारण १०) निलंगा तालुक्यातील जिल्हा परिषद निवडणूक– निटूर – सर्वसाधारण अंबुलगा बु. – सर्वसाधारण लांबोटा – सर्वसाधारण (महिला) दापका – सर्वसाधारण हलगरा – सर्वसाधारण औराद (शहा.) – सर्वसाधारण (महिला) मदनसुरी – सर्वसाधारण (महिला) सरवडी – सर्वसाधारण (महिला) कासार शिरसी – सर्वसाधारण, तांबाळा – अनुसूचित जमाती (महिला)

# न्यायमूर्ती भूषणकुमार गवई यांच्यावरील हल्ल्याच्या निषेधार्थ केज तहसील कार्यालयावर तीव्र निदर्शने

केज/प्रतिनिधन्यायमूर्तीभूषणकुमारगवईयांच्यावरीलहल्ल्याच्या निषेधार्थकेजतहसीलकार्यालयावरतीव्रनिदर्शनेकरण्यातआली, न्यायमूर्ती भूषणकुमार गवई यांच्यावर हल्ला करणाऱ्या विरुद्ध तात्काळ कारवाई करण्यात यावी. केज तालुका दलित चळवळीतील संघटना व सर्वपक्षीय आणि सामाजिक संस्थेच्या वतीने केज तहसीलदार यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली आहे. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची विचारधारापेरीत असलेल्या सर्व संघटनेच्या वतीने व सर्व समाजाच्या वतीने तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले की, दिल्ली सर्वो च्च न्यायालयाचे सरन्यायाधीश मा. भूषणकुमार गवई यांच्या दिशेने उघडून हल्ला केला आहे.ही घटना अतिशय निंदने असून अशा बिनडोक देवीचारी जातीवादी वकिलाचा सर्व आंबेडकर विचाराच्या अनुयायांच्या वतीने व सर्व दलित बहुजन समाजाच्या व पक्षाच्या वतीने जाहीर निषेध करत आहोत. तसेच हरियाणा राज्याचे आयपीएस अधिकारी पुरणकुमार सिंह यांनी जातीयव्देश भावनेच्या छळाला कंटाळून आत्महत्या केली आहे. ही आत्महत्या करण्यास प्रवर्त करणाऱ्या जातीयवादी लोकांचा




सर्व दलित आंबेडकर संघटनेच्या वतीने जाहीर निषेध करत अहो. सरन्यायाधीश मा. भूषण कुमार गवई यांच्यावर हल्ला करणाऱ्या हल्लेखोर वकिलावर खुनाचा प्रयत्न केल्याबद्दल संघटित गुन्हेगारी व अनुसूचित जमाती अंतर्गत गुन्हा नोंद करून खडक कायदेशीर कारवाई करण्यात यावी, भारत देशाच्या सर्वोच्च न्यायाधीशावर केलेला हल्ला हा देशद्रोही समजून देशद्रोह अंतर्गत खटला चालून त्या गुन्हेगार वकिलाला फाशीची शिक्षा देण्यात यावी, हरियाणा राज्याचे आयपीएस अधिकारी पुरणकुमार सिंह यांचा जातीय भावनेतून छळ करून त्यांना आत्महत्या करणाऱ्या विरुद्ध अनुसूचित जाती जमाती कायदे अन्वये गुन्हा नोंद करून आत्महत्या केल्याबद्दल कठोर शासन करण्यात यावे या मागणीचे लेखी निवेदन तहसीलदार केज यांना देण्यात आले आहे. या लेखी निवेदनावर नगराध्यक्षा डॉ. सौ.सीताताई बनसोड, ज्येष्ठ नेते चंद्रकांत खरात सर, दीपक कांबळे, लखन हजारे, गौतम बचुटे, तात्या गवळी, रोहित कसबे,योगेश गायकवाड, अशोक गायकवाड, राहुल खोडसे, दिलीप बनसोडे, अश्रुबा खरात, समाधान बचुटे, हरीश रावत गायकवाड, संगपाल वाघमारे, नवनाथ सोनवणे, सचिन साळवे, आम्रपाली गजेशीव, सदाशिव वाघमारे, बाळासाहेब जाधव, किरण कसबे यांच्यासह समाजबांधवांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## गीता परिवार पाथरवाडीच्या आध्यात्मिक पीठास सर्वतोपरी सहकार्य करेल : विठ्ठलानंद महाराज



लातूर : रेणापूर तालुक्यातील पाथरवाडी येथील श्री महादेव आणि हनुमान मंदिर अध्यात्मिक पीठाने एक समाजाभिमुख असा प्रकल्प येथे उभा केला असून समाजातील खऱ्या गरजूंना त्याचा निश्चितपणे लाभ मिळण्यासाठीच्या पूर्ण योजना या पीठाने तयार केल्या आहेत. शासनाने या अध्यात्मिक पीठास ग्रामिण तीर्थक्षेत्राचा 'क' दर्जा दिला आहे. त्यामुळे समाजात या प्रकल्पाचे महत्त्व वाढले आहे. आम्ही स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली मोशी येथे जो वेद विद्यालयाचा प्रकल्प चालवतो, तशाच पद्धतीचं वेदविद्यालय ,संस्कार पीठ आणि मुलांसाठी विविध कौशल्याधारित उपक्रम या ठिकाणी निश्चितपणे सुरू केले जातील. त्यासाठी गीता परिवार अध्यात्मिक पीठास सर्व प्रकारचे सहकार्य करेल, असे विचार विठ्ठलानंद महाराज यांनी व्यक्त केले.

रविवारी, १२ ऑक्टोबर रोजी विठ्ठलानंद महाराज पुण्याहून अध्यात्मिक पीठास भेट देण्यासाठी आले होते. तेव्हा सर्व भाविक भक्तांच्या मेळाव्यात त्यांनी उपरोक्त विचार व्यक्त केले. त्यांच्या कार्यक्रमापूर्वी लातूर येथील शारदा सदन या शाळेत संस्कृतचे अध्यापन करणाऱ्या सृष्टी आर्या यांच्या मार्गदर्शनाखाली त्या ठिकाणी होम हवन करण्यात आले. तेथील जुन्या सभागृहाचे नूतनीकरण केले असून त्या सभागृहाचा लोकार्पण सोहळा होम हवनाने झाला. सृष्टी आर्या यांनी अतिशय अभ्यासपूर्ण अशा प्रकारचे या यज्ञाचे संचालन केले आणि उपस्थित सर्व स्त्रोत्रवर्ग मंत्रमुग्ध झाला. यानंतर जो प्रगट कार्यक्रम झाला, त्या कार्यक्रमासाठी पुणे येथून ह.भ.प. शिवाजी महाराज नवल आणि ह.भ.प. ढगे महाराज यांची विशेष उपस्थिती होती. याप्रसंगी नवल महाराजांचे गीतेच्या अध्यायावर प्रवचन झाले .समाजातील निराधार अशा ज्येष्ठ महिलांना साड्या आणि पुरुषांना ब्लँकेटचे वाटप विठ्ठलानंद महाराज यांच्या हस्ते करण्यात आले.

आपल्या प्रवचनात विठ्ठलानंद महाराजांनी या प्रकल्पाची स्तुती करून अल्पावधीत या प्रकल्पाने सामान्यांच्या मनात आदराची, समर्पणाची भावना निर्माण करण्याचे महत्वपूर्ण कार्य केल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमासाठी पाथरवाडी परिसरातील आणि लातूरहून आलेले नागरिक बंधू–भगिनी अशी २०० व्यक्तींची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विलास आराध्ये गुरुजी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नवनाथ मद्दे, रमेश मद्दे, बब्रुवान खंदाडे, सर्वोत्तम कुलकर्णी, शंकर घोलप, गोरख साळुंके यासह अनेकांनी परिश्रम घेतले. श्री महादेव आणि श्री हनुमान जी यांच्या महाआरतीनंतर सर्वांनी महाप्रसाद घेतला आणि कार्यक्रमाची सांगता झाली.

# शिवराज पाटील यांचे विचार जगाला स्पर्श करणारेः प्रा. मोतीपवळे

लातूर /प्रतिनिधी– थोर व्यक्तीचा जन्म कुठेतरी व्हायचा असतो म्हणून होत असतो पण त्या ठिकाणच्या किंवा कार्य ठिकाणच्या मर्यादेपर्यंतच त्यांचे नाव व त्यांचे काम असत नाही तर त्यांचे कार्य आणि विचार हे देश पातळीवरच नव्हे तर जगाला स्पर्श करून जाणारे असतात अगदी असेच श्री शिवराज पाटील चाकूरकरांचे आहे असे प्रतिपादन प्राध्यापक पत्रकार श्री बी.व्ही. मोतीपवळे यांनी केले.

भारताच्या लोकसभेचे माजी अध्यक्ष आणि गृहमंत्री श्री शिवराज पाटील चाकूरकर यांच्या ९० व्या वाढदिवसानिमित्त लातूर येथील प्रथीत यश एम एस बिडवे इंजीनियरिंग कॉलेज च्या सभागृहामध्ये आयोजित केलेल्या वर्कशॉप कार्यक्रमाचे उद्घाटन करताना श्री मोतीपवळे यांनी वरील उद्गार काढले. अध्यक्षस्थानी महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष इंजिनीयर श्री आदिनाथ सांगवे हे होते. सचिव श्री माधवराव पाटील टाकळीकर, इंजिनीयर संचालक श्री. राजेश्वर बुके कार्यकारी संचालक श्री प्रदीप दिंडीगावे, उपाध्यक्ष श्री माधवराव पाटील तपसे चिंचोली व कॅम्पस मॅनेजर डॉ.श्री मोहनराव बुके तसेच पुण्याहून आलेले डॉक्टर श्री कल्लूर, व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.एम. जगदे, डॉ. विरभद्र माळे, माजी प्राचार्य डॉ. ज्योती पाटील, माजी प्राचार्य श्री. सुरेश हाल्लाळे, प्रा. रतन रजपुत, अजयकुमार हामणे इत्यादी उपस्थित होते. कार्यक्रमाचा प्रारंभ सरस्वती पुजनाने झाला.

पुढे बोलताना प्राध्यापक श्री. मोतीपवळे म्हणाले श्री शिवराज पाटील चाकूरकर यांचे कार्य ग्रास रूट पासून देशाच्या सर्वोच्च संस्थेच्या अध्यक्षपदापर्यंत सन्मानाने घेतले जाते त्यांचे व्यक्तित्व बहु आयामी आहे.

लातूर नगरपरिषद पाणीपुरवठा योजना, धनेगाव धरणाच्या निर्मितीची शिदोरी, ब्रॉडगेज रेल्वे, सीआरपीएफ सेंटर, बीएसएफ सेंटर, जिल्ह्यात व राज्यात मिळवून दिलेले साखर कारखाने व सूतगिरण्या हे योगदान सर्वांना माहित आहे. गृहमंत्री असताना देश पातळीवरील पोलीस युनिव्हर्सिटीची निर्मिती, जम्मू काश्मीर आणि नॉर्थ ईस्ट स्टेट मध्ये २००४ ते २००८ पर्यंतच्या काळात सुरळीतपणे पार पडलेल्या निवडणुका, नक्षलवादावरील नियंत्रण



आणि त्याचबरोबर पोलीस दल आणि एकूणच यंत्रणेचे मनोधैर्य वाढवून कामात वेग आणण्याचे कार्य प्रशंसनीय असल्याचे प्राध्यापक मोतीपवळे यांनी सांगितले.

उपराष्ट्रपती श्री शेखावत, पंतप्रधान डॉक्टर मनमोहन सिंग, पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी, पंतप्रधान पी व्ही नरसिंहराव, पंतप्रधान आई.के. गुजराल, त्याच्यानंतर चे स्पीकर सोमनाथ चटर्जी, मुख्यमंत्री श्री विलासराव देशमुख, श्री मनोहर जोशी, श्री सुशील कुमार शिंदे, सुनील गावस्कर, मोहन धारिया व इतर अनेकांनी श्री शिवराज पाटील यांचे कार्य आणि व्यक्तित्व याबद्दल केलेल्या प्रशंसेचा उल्लेख करत त्यांच्यासारख्या पुण्यशील व्यक्तीमध्ये ईश्वराचा प्रवेश होऊन त्यांच्यामार्फत जनकल्याणाचे कार्य होते आणि शिवराज पाटील यांच्या बद्दल हे सत्य आहे असे श्री काशी जगतगुरु डॉक्टर श्री चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांनी म्हटल्याचा संदर्भ दिला.

हम सबके सब हमारे हे त्यांच्या जिवनाचे सूत्र असल्याचे सांगून त्यांचे विचार सर्व मानव जातीला स्पर्श करणारे असतात असे प्रतिपादन करून त्यांना दीर्घायुष्य तर मिळालेलेच आहे पण जे काही त्यांचे आयुष्य ठरलेले आहे ते सशक्त व निरोगी रहावे अशी प्रार्थना करून आपले भाषण संपले. श्री मोतीपवळे यांनी केलेल्या भाषणातील वक्तव्यामुळे उपस्थित समुदायाला त्यांनी तब्बल दीड तास खिळवून ठेवले.

अध्यक्षीय भाषणात श्री आदिनाथ सांगवे यांनी श्री शिवराज पाटील यांच्या कार्याचा व विचाराचा आढावा घेऊन त्यांना दीर्घायुष्य चिंतेले. सत्याचा, त्यागाचा व नैतिकतेचा मार्ग दाखवणारे श्री शिवराज पाटील हे दीपस्तंभ आहेत अशा भावना व्यक्त करून ते संस्थेचे सदस्य असून संस्था उभारणीत त्यांचा मोलाचा वाटा आहे याचा आम्हाला अभिमान आहे. असे प्रतिपादन करून श्री. शिवराज पाटील चाकूरकर यांना दिर्घ आयुष्य चिंतले. कॅम्पस मॅनेजर डॉक्टर श्री मोहनराव बुके यांनी प्रास्ताविक केले तर प्रा. श्री भोसले यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास सर्व प्राध्यापक शहरातील इंजिनियर्स व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं.१०, मनपा शॉपींग कॉम्पलेक्स, गांधी चौक, लातूर–४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास खडक हनुमान मंदिर मिलिंद नगर लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.